# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### पालघर जिल्ह्यातील आदिवासींचे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेची कामे तात्काळ सुरू करण्याबाबत

**(१) १३६४७ (३०-०६-२०२२) श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, मोखाडा, वाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील डोंगराळ भागातील आदिवासींना रोजगार हमी योजनेची कामे पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याने आदिवासी कुटुंबीयांचे इतर जिल्ह्यात होत असलेले स्थलांतर रोखण्यासाठी पालघर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेची कामे सुरू “समर्थन” या संस्थेने मा.मंत्री, रोजगार हमी योजना, मा.मंत्री, कृषी तथा पालक मंत्री (पालघर जिल्हा) तसेच शसनाकडे दिनांक ४ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुषंगाने पालघर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेची कामे लवकरात लवकर सुरू करण्याबाबत तसेच आदिवासी कुटुंबीयांचे इतर जिल्ह्यात होत असलेले स्थलांतर रोखण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडून दिनांक १३/५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्ह्यातील सर्व तहसिलदार तथा गट कार्यक्रम अधिकारी व गट विकास अधिकारी तथा सहगट कार्यक्रम अधिकारी यांना पत्र देऊन रोजगार हमी योजनेमधून जास्तीत जास्त कामे घेवून जिल्ह्यातून आदिवासी बांधवांचे स्थलांतर होणार नाही याबाबत काळजी घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच सन २०२१-२२ मध्ये ठरविण्यात आलेल्या एकूण २३.६९ लक्ष मनुष्यदिवस निर्मिती उद्दिष्टापैकी ६६.८० लक्ष मनुष्यनिर्मिती करून हा जिल्हा राज्यात व्दितीय क्रमांकावर होता.तर सन २०२२-२३ या चालू आर्थिक वर्षात एकूण ६३,०२२ कुटुंबातील २९,०५,१८२ आदिवासी मजूरांना काम देण्यात जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील होमगार्ड यांच्या अनेक प्रलंबित मागण्याबाबत

**(२) १३७४७ (३०-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस विभागातील भरती प्रक्रियेत दर तीन वर्षांनी ५० टक्के आरक्षण देण्यात यावे अथवा इतर राज्याप्रमाणे होमगार्ड जवानांना त्यांच्या तीन वर्षाच्या सेवेनंतर राज्य पोलीस विभागात सरळ नियुक्ती देण्यात यावी यासारख्या अनेक मागण्यांसाठी अनेक लोकप्रतिनिधींनी यांनी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार मागणी करूनही होमगार्ड यांच्या समस्या अद्याप प्रलंबित आहेत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त लोकप्रतिनिधी यांच्या मागणीच्या अनुषंगाने होमगार्ड जवानांना त्यांच्या तीन वर्षाच्या सेवेनंतर राज्य पोलीस विभागात सरळ नियुक्ती देण्याबाबत तसेच पोलीस विभागातील भरती प्रक्रियेत ५० टक्के आरक्षण देण्याबाबत शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२२) :** (१) नाही.

(२) नाही.

मा.गृह (मंत्री) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विविध बैठकीत होमगार्डस यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आलेले आहे.

(३) व (४) होमगार्ड यांना पोलीस शिपाई पदाच्या सेवाप्रवेश नियमाचे अटीचे अधिन पोलीस शिपाई भरतीत ५% आरक्षण ठेवण्यात आले आहे.

---

## गल्ले बोरगांव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे मका संशोधन केंद्र सुरु करणेबाबत

**(३) १३८८३ (३०-०६-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गल्ले बोरगांव (ता.खुलताबाद जि.औरंगाबाद) येथे मका पीकाच्या वाढत्या क्षेत्रामुळे संशोधनाच्या दृष्टीकोनातून गल्लेबोरगांव येथे मका संशोधन केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव १० वर्षापूर्वी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी यांनी शासनाकडे सादर असून तो अद्याप प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गल्लेबोरगांव येथील कृषी विभागाच्या जमिनीवर ८ एकर जागा मका संशोधन प्रकल्पासाठी संमती मिळाली आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मका संशोधन केंद्राची उभारणी झाल्यास मका पिकावरील रोग व किडीचा अभ्यास करुन त्यावर तात्काळ उपाय योजना झाल्यास किड/अमेरिकन लष्कर अळीचा बंदोबस्त करण्यास मदत होणार आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, १० वर्षापूर्वी प्रकल्प उभा राहीला असता तर लष्करी अळीवर संशोधन होऊन मका पिके वाचवणेसाठी उपाय योजनाची सखोल माहिती शेतकऱ्यांना मिळून उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली असती हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गल्ले बोरगांव येथील मका संशोधन केंद्र तात्काळ सुरु करणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१८-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तालुका बिजगुणन केंद्र, गल्ले बोरगांव, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद येथील कृषी विभागाच्या जमिनीचा/काही क्षेत्राचा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठास "मका" पिकाच्या संशोधित वाणाच्या लागवडीसाठी व संशोधनासाठी वापर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(३) व (४) राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प, औरंगाबाद येथे कार्यरत असून, या प्रकल्पात मका पिकावर झालेल्या संशोधन आणि विस्तार कार्यक्रमाअंतर्गत मका पिकावरील लष्करी अळी व्यवस्थापनाबाबत व मका पिकाचे एकात्मीक व्यवस्थापन करण्यासंदर्भात प्रक्षेत्र भेटी देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे तसेच तज्ञ मार्गदर्शक यांच्या सहाय्याने शेतकऱ्यांचे तक्रार निवारण करण्यासाठी मका पिकास भेट देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे, कृषी विज्ञान केंद्र व वंसतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, कृषी विभाग यांचेमार्फत मका पिका संदर्भात शेतकऱ्यांना वेळोवेळी सल्ला व मार्गदर्शन करण्यात येत आहे.
(५) मौजे गल्ले बोरगांव येथे मका संशोधन केंद्र स्थापन करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्याच्या विविध मागणीसाठी सर्वपक्षीय शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाबाबत

**(४) १३९१९ (३०-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)राज्यातील शेतकऱ्याच्या विविध मागण्यासाठी पुणतांबा येथिल सर्वपक्षिय शेतकऱ्यांनी शासनाच्या विरोधात एल्गार पुकारला असून दिनांक १ जुन २०२२ पासून राज्यव्यापी शेतकरी आंदोलन करण्याचा निर्णय विशेष शेतकरी ग्रामसभेत घेण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामसभेत घेतलेला ठरावानुसार असलेल्या मागणीचा सात दिवसात मागण्या मान्य करण्याबाबत शेतकरी सोबत महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुले सुध्दा सहभागी होणार असल्याबाबत स्पष्ट इशारा शासनाला दिला आहे हेहि खरे आहे काय,
(३) असल्यास, सादर केलेल्या मागण्या सोबतच सन २०१७ मध्ये पुणतांबातील शेतकरी संपाच्या दरम्यान शेतकऱ्यांवर लावलेले गुन्हे सुध्दा मागे घेण्याबाबत मागणी केलेली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या विविध मागण्या मान्य करण्याबाबत तसेच पुणतांबातील शेतकरी संपाच्या दरम्यान शेतकऱ्यांवर लावलेले गुन्हे सुध्दा मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१८-०८-२०२२) :** (१) ग्रामसभेतील निर्णयासंदर्भात कृषी विभागास अवगत करण्यात आलेले नाही. तथापि, श्री.अजितदादा पवार, तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडून मौजे पुणतांबा, जि.अहमदनगर येथील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या बैठकीस उपस्थित राहण्याबाबत प्राप्त सूचनेसमवेत संलग्न निवेदनावरुन श्री.दादाजी भुसे, तत्कालीन मा.मंत्री (कृषी) यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत शेतकऱ्यांसमवेत चर्चा केली असल्याचे दिसून येते.
(२) श्री.दादाजी भुसे, तत्कालीन मा.मंत्री (कृषी) यांनी शेतकऱ्यांशी झालेल्या चर्चेनंतर ७ दिवसांनी म्हणजेच दिनांक ७ जून, २०२२ रोजी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आयोजित करावयाच्या बैठकीत सर्वंकष चर्चा करुन सकारात्मक निर्णय घेण्याबाबत आश्वस्त केले असल्याचे बैठकीस उपस्थित राहण्याबाबत प्राप्त सूचनेसमवेत संलग्न निवेदनावरुन दिसून येते.
(३) होय.
(४) श्री.अजितदादा पवार, तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांनी त्यांचे मंत्रालयीन दालनात दिनांक ७ जून, २०२२ रोजी मौजे पुणतांबा, जि.अहमदनगर येथील शेतकऱ्यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. चर्चेतील निर्णयानुसार बैठकीचे इतिवृत्त तत्कालीन मा.मंत्री (कृषी) यांच्यामार्फत तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांचे स्तरावर सादर करण्यात आले होते. तथापि, सदर बैठकीचे इतिवृत्त अंतिम न होता नस्ती विभागास परत करण्यात आली आहे.

राज्यात राजकीय व सामाजिक आंदोलनामुळे दाखल झालेल्या खटल्यांसंदर्भात गृह विभागाच्या दिनांक १४/३/२०१६ च्या आदेशानुसार जर अशा घटनेत जिवितहानी झाली नसेल किंवा खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचे रुपये ५ लाख पेक्षा जास्त नुकसान झाले नसेल तर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३२१ नुसार खटले मागे घेण्याची कार्यवाही करण्यात येते. त्याचबरोबर राज्यात जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली क्षेत्रिय समित्या गठीत केल्या असून या समित्यांकडून राजकीय व सामाजिक आंदोलनामुळे दिनांक ३१/१२/२०१९ पर्यंत ज्या गुन्ह्यामध्ये दोषारोप पत्र दाखल झाले आहे ते सर्व खटले मागे घेण्याबाबतची कायदेशीर कार्यवाही प्रचलित धोरणानुसार करण्यात येत आहे. सन २०१७ मध्ये शेतकऱ्यांच्या संपात एकही गुन्हा दाखल नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरुड पोलीस ठाणे (ता.मुरुड, जि.रायगड) इमारत व पोलीस वसाहतीची पुनर्बांधणी व दुरुस्ती करण्याबाबत

**(५) १३९५८ (३०-०६-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड पोलीस ठाणे (ता.मुरुड, जि.रायगड) इमारत १०० वर्षे जुनी व जीर्ण झाली असून इमारतीसह पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्याकरीता असलेल्या २७ खोल्यांची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जीर्ण झालेल्या पोलीस कर्मचारी वसाहतीची देखभाल, दुरुस्तीअभावी दुरवस्था झाली असून सदर धोकादायक वसाहतीत पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना वास्तव्य करावे लागत आहे, तर काही पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांवर इतरत्र ठिकाणी भाड्याच्या घरात राहण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुरूड पोलीस ठाणे इमारत व पोलीस वसाहतीची पुनर्बांधणी व दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) :** (१), (२) व (३) होय.

पोलीस अधीक्षक, रायगडच्या अधिनस्त असलेले मुरूड पोलीस ठाणे (ता.मुरूड, जि.रायगड) इमारत व पोलीस वसाहतीची पुर्नबाधणी व दुरुस्ती करण्याच्या बांधकाम प्रस्तावाच्या अनुषंगाने पोलीस अधिकारी/ अमंलदार यांच्याकरीता पोलीस सेवा निवासस्थान बांधकामासाठी तयार करण्यात आलेल्या प्राधान्यक्रम यादीस मान्यता देण्याची बाब शासनस्तरावर विचाराधिन आहे. प्राधान्यक्रम यादीस शासन मान्यता व निधी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील डी वाय पाटील स्टेडियमवर झालेल्या आयपीएलच्या सामन्यावेळी ट्रिग या सुरक्षा एजन्सीकडून सुरक्षेमध्ये झालेल्या हलगर्जीपणाबाबत

**(६) १४०५९ (०३-०७-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील नेरूळ येथील डी वाय पाटील स्टेडियमवर झालेल्या आयपीएलच्या सामन्याच्यावेळी ट्रिग या सुरक्षा एजन्सीकडून सुरक्षेत हलगर्जीपणा झाल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई पोलिसांना काही सुरक्षारक्षकांच्या हालचालीवर संशय आल्यावरुन त्यांनी सुरक्षारक्षकांचे ओळखपत्र तपासून अधिक चौकशी केली असता ओळखपत्रावरील नाव व प्रत्यक्षात उपस्थित व्यक्ती वेगळी असल्याचे समोर आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी बीसीसीआयला अहवाल पाठवून कारवाईचे संकेत मिळताच ट्रिग सिक्युरिटी एजन्सीवर नेरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ?

(५) असल्यास, सदर चौकशीअंती ट्रिग सिक्युरिटी एजन्सीच्या सुरक्षारक्षकांवर व मालकांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.

नवी मुंबई पोलिसांना काही सुरक्षारक्षकांच्या हालचालीवर संशय आल्याने त्यांनी सुरक्षारक्षाकांचे ओळखपत्र तपासले असता ओळखपत्रावरील नाव व प्रत्यक्षात उपस्थित व्यक्ती वेगळी असल्याचे समोर आले.
(३) सदर प्रकरणी ट्रिग सिक्युरिटीचे मालक, सुपरवायझर, सिक्युरिटी मॅनेजर, सिनीअर प्रेसिंडेंट आणि अन्य एका इसमावर नेरुळ पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.१९०/२०२२ भादंवि कलम ४१९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(४) व (५) सदर प्रकरणी सदरच्या सुरक्षा एजन्सीवर गुन्हा दाखल करण्यात आलेला
आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवलीच्या शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात लुटारु/ दरोडेखोरांनी थैमान घातल्याबाबत

**(७) १४१२८ (०३-०७-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१).कल्याण-डोंबिवलीच्या शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात लुटारु/दरोडेखोरांनी दरोडे घातल्याचे नुकतेच माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मे, २०२२ च्या महिन्यात याबाबतच्या तब्बल चार घटना घडल्या असून त्यामध्ये ५ लाख ६१ हजारांचा ऐवज लंपास करण्यात आला आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहर व ग्रामीण भागात होत असलेल्या दरोड्यामुळे परिसरात प्रचंड घबराटीचे वातावरण पसरलेले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दरोडेखोरांना पकडण्यास पोलिसांना अपयश आले आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दरोडेखोरांना पकळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातंर्गत मे २०२२ मध्ये दरोड्याबाबत कोणताही गुन्हा नोंद नाही. परंतु दिनांक ०७/०५/२०२२ रोजी मानपाडा येथील सारा एन्टरप्रायझेस या कंपनीच्या गोडाऊनचा छत तोडून चोरटयाने रुपये ७,००,२४६ इतक्या रकमेच्या मशिनरीची चोरी केल्याने मानपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३४४/२०२२ अन्वये भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८० गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच, कल्याण मध्ये दिनांक १३/०३/२०२२ रोजी दरोड्याबाबत खडकपाडा पोलीस ठाणे कल्याण येथे गु.र.क्र. १०३/२०२२ भा.दं.वि. कलम ३९५, ४२७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.तथापि, सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान दरोड्याचा प्रकार झाला नसल्याचे निष्पन्न झाले असल्याने दिनांक २०/०३/२०२२ रोजी ३९५ कलम कमी करून भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, १४३, १४७, १४९ समाविष्ठ करण्यात येऊन गुन्ह्याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

(४) व (५) खडकपाडा पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यातील चार आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या आरोपी जामीनावर आहेत. तसेच संबंधितांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईकडे निघालेल्या सिकंदराबाद-मुंबई एक्सप्रेसवर मध्यरात्रीच्या सुमारास मनमाडजवळील पोटुळ स्थानकांदरम्यान सशस्त्र दरोडा टाकून दरोडेखोरांनी ७ ते ८ डब्यातील प्रवासांशा लुटल्याची घटना घडल्याबाबत

**(८) १४१५२ (२३-०६-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईकडे निघालेल्या सिकंदराबाद-मुंबई एक्स्प्रेसवर मध्यरात्रीच्या सुमारास मनमाडजवळील पोटुळ स्थानकांदरम्यान सशस्त्र दरोडा टाकून दरोडेखोरांनी ७ ते ८ डब्यातील प्रवाशांना लुटल्याची घटना माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये मध्यरात्रीच्या वेळी प्रवाशांवर टाकण्यात येत असलेले दरोड्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रवाशांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

सिकंदराबाद-मुंबई एक्सप्रेस दिनांक २२/०४/२०२२ रोजी मनमाड जवळील पोटूळ येथे असताना गाडीतील प्रवाशांना लूटण्याची घटना घडली असून याबाबत रेल्वे पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे गु.र.नं.१४१/२०२२, भा.दं.वि. कलम ३९४, ३९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात येऊन त्यांच्या विरोधात मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(२) व (३) अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता लोहमार्ग पोलीस व रेल्वे सुरक्षा बल चे अधिकारी यांच्यामध्ये दिनांक २२/०४/२०२२ रोजी समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीतील निर्णयानुसार जालना-मनमाड रेल्वे मार्गावर गार्ड नेमण्यात आले आहेत तसेच, नंदीग्राम, देवगिरी, राजाराणी एक्सप्रेस व डेमो ट्रेन येथे आरपीएफ व जीआरपी पोलीस अंमलदार यांची पेट्रोलिंगकरीता नेमणूक करण्यात आली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गवाणे केंद्र शाळा क्र.१ च्या मुख्याध्यापक यांनी सहावीतील मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(९) १४१५४ (२३-०६-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गवाणे केंद्र शाळा क्र १ च्या मुख्याध्यापक यांनी सहावीतील मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी लांजा पोलीस ठाण्यात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने दोषी मुख्याध्यापकांविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी लांजा पोलीस ठाणे गु.र.नं ७७/२०२२ भा.दं.वि. कलम ३५४(अ) सह लैगिंक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८, ९(फ), (म), १०, १२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. आरोपी विरुध्द दिनांक ०९/०६/२०२२ रोजी मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यात शंभर रुपयाच्या मुद्रांकाची वाढीव दराने विक्री होत असल्याबाबत

**(१०) १४२६६ (३०-०६-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात महसूल विभागाचे विविध शासकीय कार्यालये तथा शाळा महाविद्यालयांमध्ये सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्रासाठी व विविध करारनामे तसेच अन्य कामासाठी शेतकरी व विद्यार्थी यांच्याकडून १०० रुपयांच्या मुद्रांकाची मागणी वाढली असून जिल्ह्यात शंभर रुपयांच्या मुद्रांकावर अधिकचे १० रुपये आकारुन विक्री केली जात असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी, विद्यार्थी यांना नाहकचा भुर्दंड सहन करावा लागत असून अधिकचे १० रुपये देणाऱ्यांनाच मुद्रांक मिळत आहेत अन्यथा मुद्रांक संपल्याचे सांगून कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असून मुद्रांक विक्री करणारे स्थानिक शेतकरी व विद्यार्थी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अधिकृत मुद्रांक विक्रेत्यांकडून मुद्रांक विक्री केली जात असताना व त्याची रितसर नोंदणी होत असताना अधिकची रक्कम आकारुन मुद्रांक विकणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पोलीस ठाण्यात महिला स्वच्छतागृहांचा अभाव असल्याबाबत

**(११) १४३६२ (३०-०६-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महिला पोलिसांसाठी राज्यातील निम्म्यापेक्षा अधिक पोलीस ठाण्यात स्वतंत्र स्वच्छतागृहे नसल्याची गंभीर बाब दिनांक ६ मे,२०२२ रोजी निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास राज्यात एकूण १३ पोलीस आयुक्तालय आणि ३६ जिल्हा पोलीस घटक आहेत परंतु माहिती अधिकारातून प्राप्त झालेल्या अहवालातून एकूण १०१० पोलीस ठाण्यापैकी अर्ध्यापेक्षा जास्त पोलीस ठाण्यात महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह ची सुविधा नाही हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण पोलीस ठाण्यातील महिला कर्मचाऱ्यांना पोलीस ठाण्याच्या शेजारील घरांचा आधार घ्यावा लागतो हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंबाने तातडीने पोलीस महिलांसाठी स्वच्छतागृहांची सोय करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) होय. हे अंशत: खरे आहे.

i. महाराष्ट्र राज्यात लोहमार्ग पोलीस आयुक्तालयासह एकूण १२ पोलीस आयुक्तालये आणि ३६ जिल्हा घटक आहेत. त्यापैकी सर्व पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उपलब्ध आहेत.

ii. पोलीस आयुक्तालये वगळता इतर आस्थापनेवरील एकूण १०२१ पोलीस ठाण्यांपैकी -

अ) १००३ पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उपलब्ध आहेत.

ब) उर्वरित १८ पैकी १६ पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी प्रसाधनगृहे बांधण्याचे प्रस्तावित असून लोहमार्ग नागपूर यांच्या आस्थापनेवरील २ पोलीस ठाणे हे रेल्वे प्रशासनाच्या जागेत असल्याने त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे स्वतंत्र बांधकाम करण्याची परवानगी नाही.

iii. महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांच्याकडून बांधण्यात येणाऱ्या पोलीस ठाण्यांच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांचा समावेश आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात तुकडा बंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता विकास आणि नियम कायदा (रेरा) या दोन्ही कायद्यांचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(१२) १४४६७ (३०-०६-२०२२) श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्री.अरुण लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तुकडा बंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता विकास आणि नियम कायदा रेरा या दोनही कायद्यांचे उल्लंघन करून तसेच सक्षम प्राधिकाकार्याचे खोटे ना-हरकत प्रमाणपत्र देऊन तब्बल १० हजार ६३५ मालमत्तांची बोगस दस्त नोंदणीचा प्रकार उघडकीस आल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दस्तनोंदणी द्वारे कोट्यवधी रुपयांचा अनियमितता केल्याप्रकरणी राज्यभरातील दुय्यम निबंधक कार्यालयांमधील ४४ अधिकाऱ्यांवर नोंदणी महानिरीक्षक यांनी विभागीय चौकशीची कारवाई केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुकडाबंदी आणि रेरा कायद्यांचे उल्लंघन करून झालेल्या दस्त नोंदणीची तपासणी करण्याची नोंदणी उपनिरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या पथकाने तयार केलेल्या अहवालानुसार करावाई करण्यात येत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पथकाने तयार केलेल्या तपासणी अहवालाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू अहवाल सर्वसाधारणांसाठी खुला करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुणे विभागामध्ये तुकडाबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायदयांचे उल्लंघन करुन १०५६१ दस्तऐवजांची नोंदणी झाली असल्याचे तपासणीत उघडकीस आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नोंदणीकृत दस्तामध्ये आकारणी करण्यात आलेले मुद्रांक शुल्क व नोंदणी फी योग्य असून त्यामध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, तुकडाबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायदयांचे उल्लंघन करुन दस्त नोंदणी झालेल्या प्रकरणात ४४ अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.
(४) शासन नियुक्त तपासणी पथकाने केलेल्या तपासणीचा अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवाल सर्वसाधारणांसाठी खुला करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर शहरासह जिल्ह्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या नवीन पोलीस वसाहती उभारणीचे प्रस्तावाबाबत

**(१३) १४४७५ (३०-०६-२०२२) श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर शहरासह जिल्ह्यातील अन्य २३ पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या शेकडो पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानचे प्रश्न गंभीर बनलेला असून गेल्या तीन वर्षांपासून नवीन पोलीस वसाहती उभारणीचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेल्या ५० टक्के कर्मचाऱ्यांना वास्तव्यास घरे नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांचे गैरसोईला सामोरे जावे लागत असून याबाबत वारंवार शासनाकडे व स्थानिक प्रशासनाकडे लोकप्रतिनिधी व पोलीस प्रशासनाकडून मागण्या करूनही कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचे आढळून आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त नवीन पोलीस वसाहती उभारणीचे प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२२) :** (१), (२) व (३) पोलीस महासंचालक यांनी राज्यातील ५६,९२३ सेवानिवासस्थाने यांचे बांधकाम करण्याबाबतच्या प्रकल्पास प्राधान्यक्रम ठरविला आहे. सदर यादीस शासन मान्यता मिळण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. शासन मान्यतेनंतर व निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कामे महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, यांच्या मार्फत हाती घेण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तळोजा कारागृहातील दुरवस्था व प्रशासनाकडून कैदयांना मिळणारी अपमानास्पद वागणूकीबाबत

**(१४) १४५०६ (०३-०७-२०२२) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा कारागृहातील दुरवस्था आणि प्रशासनाकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक या विरोधात भिमा कोरेगाव खटल्यातील बंदी सागर गोरखे यांनी दिनांक २० मे २७ मे २०२२ दरम्यान उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तळोजा कारागृहातील दुरवस्था आणि प्रशासनाकडून कैद्यांना मिळणारी अपमानास्पद वागणूक या विरोधात तसेच इतर मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) बंदी सागर गोरखे यांनी दिनांक २३/०५/२०२२ ते दिनांक २७/०५/२०२२ पर्यंत जेवण घेतले नाही. परंतु, नमूद कालावधीत बंदी गोरखे पाणी व ओ.आर.एस.पावडर मिश्रीत पाणी घेत होता.तसेच या कालावधीत कारागृह प्रशासनाकडून दैनंदिन जेवण घेण्याबाबत समुपदेशन करुन बंद्याची वैद्यकीय तपासणी करण्यात येत होती. त्यावेळी बंद्याचे वैद्यकीय पॅरामीटर्स नॉर्मल होते. बंद्याचे कारागृह प्रशासनाकडून पुन:श्च समुपदेशन केले असता, बंद्याने दिनांक २७/०५/२०२२ रोजी सायंकाळी जेवण घेऊन उपोषण सोडले.

तथापि, तळोजा मध्यवर्ती कारागृह प्रशासनाकडून बंद्यांना अपमानास्पद वागणूक दिली जात नाही. कारागृहातील आजारी बंद्यांना वेळोवेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत औषधोपचार करण्यात येतो. वैद्यकीयदृष्ट्या आवश्यकता वाटल्यास बाहेरील शासकीय रुग्णालयात बंद्यांस पाठवून तपासणी व उपचार करण्यात येतात. तसेच मान्यताप्राप्त सेवाभावी संस्थेमार्फत कारागृहात त्वचारोग, नेत्र तपासणी शिबीरे आयोजित करुन बंद्यांवर योग्य ते उपचार करण्यात येतात. कोरोना महामारीच्या कालावधीत बंद्यांना पहिला, दुसरा व बुस्टर डोस देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आमखुर्द (ता.सालेकसा, जि.गोंदिया) येथील लाभार्थ्यांना सिंचन विहिरीचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(१५) १४५७५ (२३-०६-२०२२) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमखुर्द (ता.सालेकसा, जि.गोंदिया) येथे मनरेगांतर्गत सन २०१७-२०१८ मध्ये सिंचन विहिरी मंजूर करुन त्याचे बांधकाम करण्यात आले असून चार वर्षापासून लाभार्थ्यांनी अनेकदा पत्रव्यवहार करुनही शासनाकडून सिंचन विहिरींचा निधी दिला गेला नसल्यामुळे लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ आल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंचन विहिरीचा प्रलंबित निधी देण्याची मागणी लाभार्थ्यांनी जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे केली असून निधी न मिळाल्यास उपोषण करण्याचा इशारा मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री व जिल्हाधिकारी, गोंदिया यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिंचन विहिरीचा प्रलंबित निधी तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१७-०८-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) आमगांवखुर्द (ता.सालेकसा, जि.गोंदिया) हे गाव ग्रामपंचायत असताना येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये सिंचन विहिरींची कामे मंजूर करण्यात आली होती. आमगावखुर्द तत्कालीन ग्रामपंचायत येथे मनरेगाअंतर्गत पूर्ण झालेल्या सिंचन विहिरींचे देयके प्रलंबित आहेत. आमगावखुर्द या गावाचा सालेकसा या नगरपंचायतीमध्ये समावेश झाला असून शासन पत्र दिनांक २१ मे, २०१५ नुसार ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये समावेश / रुपांतर या कारणांनी मनरेगाअंतर्गत अपूर्ण राहीलेले कामे पूर्ण करण्याकरीता राज्य रोहयोतून निधी उपलब्ध करुन दिला जातो. आमगांवखुर्द ही तत्कालीन ग्रामपंचायत अस्तित्वात असतानाच मनरेगाअंतर्गत सिंचन विहिरीचे काम पूर्ण झाले आहे, असे मुख्याधिकारी, नगरपंचायत, सालेकसा यांच्या दिनांक ०४ एप्रिल, २०२२ रोजीच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. सबब, सिंचन विहिरींच्या कामांची देयके महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अदा करण्याबाबत शासनपत्र दिनांक २५ जुलै,२०२२ अन्वये आयुक्त, नरेगा आयुक्तालय, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यात मातोश्री ग्रामीण पाणंद रस्ता योजनेंतर्गत प्रशासनाच्या दिरंगाईमुळे रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१६) १४६०३ (३०-०६-२०२२) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात ३०० कि.मी. चे मातोश्री ग्रामीण पाणंद रस्ता योजनेंतर्गत प्रशासनाच्या दिरंगाईमुळे आजपर्यंत रस्त्याचे काम सुरु झाले नसल्याची बाब माहे मे २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार वाशिम जिल्ह्यात ३०० कि.मी. चे मातोश्री ग्रामीण पाणंद रस्ता योजनेंतर्गत रस्त्याचे काम सुरु करणेबाबत व रस्ता सुरु करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

वाशिम जिल्ह्यात एकूण १८५ पाणंद रस्ते मंजूर झाली आहे. त्यापैकी ९ पाणंद रस्ते शासनाकडून रद्य करण्यात आली असून एकूण १७६ पाणंद रस्ते मंजूर झाली आहेत, त्यापैकी १६७ पाणंद रस्ते यांना तांत्रिक मान्यता मिळाली असून १६१ कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे व एकूण ४८ रस्त्याची कामे सुरु झाली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) ग्रामपंचायत स्थरावरुन विहित वेळेत पाणंद रस्त्यांचे प्रस्ताव प्राप्त न होणे, ग्रामपंचायत स्तरावर मजूरांची काम मागणी अर्ज प्राप्त न होणे, काही कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत, तथापि, पावसाळा सुरु झाल्यामुळे कामे सुरु करता आली नाहीत.

---

## नोंदणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी मुद्रांक शुल्क कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१७) १४६३७ (३०-०६-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात ५, अंधेरी विभागात ८, बोरीवली विभागात ९ व कुर्ला विभागात ४ अशी एकूण २६ दस्त नोंदणी कार्यालये आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयात नोंदणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना कार्यालयातील सर्व्हर डाऊन होणे, अनेक वेळा मुद्रांक शुल्काकरीता वारंवार यावे लागणे तसेच कार्यालयातील अनेक सुविधा व गैरसोयीमुळे नागरिक हैराण होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून व्यवस्थापनाकडे वारंवार करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली अहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हस्त नोंदणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी मुद्रांक शुल्क कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होऊन दस्त नोंदणीचे व्यवहार तात्काळ पूर्ण व्हावेत याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

नोंदणी विभागाच्या सर्व्हरवर एकाचवेळी राज्यातील सर्व कार्यालयांकडून नोंदणी प्रक्रीया सुरु झाल्यास काही वेळेस सर्व्हरवर तांत्रिक अडचण निर्माण होते. हे खरे आहे. ही बाब निदर्शनास आल्यास वरिष्ठ पातळीवरुन दखल घेवून, तांत्रिक अडचण दूर करुन नोंदणीची प्रकीया पूर्ववत केली जाते. दस्त नोंदणीस येणाऱ्या पक्षकारांचा दस्त त्याच दिवशी नोंदणी पूर्ण केला जातो. त्यामुळे दस्त नोंदणीकरीता पक्षकार यांना वारंवार कार्यालयात यावे लागते, हे खरे नाही.

(३) मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील बहुतेक सह दुय्यम निबंधक कार्यालये ही एम.टी.एन.एल. व खाजगी इमारतीत भाड्याने असून जनतेकरीता पक्षकारांसाठी बैठक व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व प्रसाधनगृह सुविधा उपलब्ध असल्यामुळे नागरिकांची कोणतीही गैरसोय होत नाही. तसेच सुविधांबाबत तोंडी अथवा लेखी तक्रार नोंदणी कार्यालयास प्राप्त नाही.

विभागाचे स्तरावरुन नोंदणी प्रक्रीया जलद व सुलभ होण्याकरीता मुद्रांक शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन सुविधा तसेच विकसकाकडून घेण्यात येणाऱ्या सदनिकेचा मिळकतीचा प्रथम दस्त नोंदणीकरीता ऑनलाईन सुविधा, लिव्ह ॲण्ड लायसन्स दस्त, ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. तथापि, एम.टी.एन.एल. कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली कनेक्टीव्हीटी खंडीत झाल्यास दस्त नोंदणीस व्यत्यय येऊ नये, यासाठी सर्व सह.दुय्यम निबंधक कार्यालयात या सेकंडरी कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आलेली असून त्यामुळे पक्षकाराचे दस्त नोंदणी करताना अडचण निर्माण होत नाही.

तसेच दस्त नोंदणीकरीता वापरण्यात येणाऱ्या आय सरिता या सर्व्हरशी Pan, E-KYC, LR Grass व DHC इ.सर्व्हर जोडले गेलेले आहेत. यापैकी एखादे सर्व्हर SLOW/बंद असले तरीही दस्त नोंदणीचे काम बंद पडते. सर्व्हरविषयक तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्यासाठी नोंदणी कार्यालयात Command and Control रुममध्ये सर्व्हरविषयक अडचणीचे तात्काळ निराकरण करणेकामी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. सल्लांगारामार्फत सर्व्हर, नेटवर्क, हार्डवेअर इ. कामकाजावर सातत्याने नियंत्रण ठेवले जात असून सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांना Secondary Connectivity चा पुरवठा करण्यात आलेला आहे. दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीच्या वेळी हार्डवेअर/सॉप्टवेअर विषयी येणाऱ्या अडचणीचे निरकारण करण्यासाठी सह जिल्हा निबंधक कार्यालयाच्या स्तरावर System Support Engineer यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## मौजा गादा (ता.कामठी, जि.नागपूर) येथे जिल्हा क्रिडा संकुलाचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत

**(१८) १४८७३ (३०-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा गादा (ता.कामठी जि.नागपूर) येथे जिल्हा क्रिडा संकुल व फुटबॉल मैदानाच्या बांधकामासाठी शासनाने सन २०१६ मध्ये रुपये २४ कोटीचा निधी मंजूर केला होता हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बांधकाम सन २०१७ मध्ये सुरू करण्यात आले परंतु अद्यापपर्यंत बांधकाम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा क्रिडा संकुल बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-०८-२०२२) :** (१) व (२) नागपूर जिल्हा क्रीडा संकुलासाठी यापुर्वीच्या अनुदान मर्यादेनुसार तसेच सुधारित अनुदान मर्यादेनुसार एकूण रुपये ११.१९ कोटी इतके शासन अनुदान वितरित केले आहे. सदर अनुदानाच्या रकमेतून नॅचरल ग्रास सह फ़ुटबॉल मैदान आणि इतर क्रीडा सुविधांचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच बॅडमिंटन हॉल चे काम अंतिम टप्प्यात आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## नेवरी ते कोळी शिवपाणंद (ता.हदगांव, जि.नांदेड) या पाणंद रस्त्यांचे काम बंद केले असल्याबाबत

**(१९) १४९१२ (३०-०६-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवरी ते कोळी (ता.हदगांव, जि.नांदेड) शिव पाणंद रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळालेली आहे माती खोदकाम देखील झाले आहे परंतु स्थानिक व्यक्तींच्या दबावामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी चुकीचा अहवाल शासनास कळवून या पाणंद रस्त्यांचे काम बंद केले असल्याचे माहे जून, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याचे काम बंद असल्याने पावसाळयात शेतीवर जाण्यासाठी शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे चुकीचा अहवाल शासनाकडे सादर न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा स्थानिकांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाला दिला असून शासन याप्रकरणी त्वरीत चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) उक्त काम बंद करण्याबाबत कोणताही अहवाल क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेला नाही, त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हनुमान टेकडी (ता.भिवंडी, जि.ठाणे) परिसरातील गुडांवर कारवाई करण्याबाबत

**(२०) १४९४१ (३०-०६-२०२२) श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हनुमान टेकडी (ता.भिवंडी, जि.ठाणे) परिसरातील गुडांकडून स्थानिक महिलांना देहविक्रीची कामे करण्यास जबरदस्ती करीत असून महिलांनी जीवे मारण्याची धमकी देणे, शिवीगाळ, मारझोड करीत असल्याचे प्रकार माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पीडित महिला शबाना शेख व इतर यांनी अशफाक मोमीन, राजु गोलार, रियास पानसरे, अफसर खान, रमेश लामा, अमित कांबळे, रमजान शेख, नासिर खान व नामदेव जाधव या गुडांकडून होत असलेल्या त्रासाबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भिवंडी शहर पोलीस स्टेशन, भिवंडी यांचेकडे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी व पोलीस आयुक्त, ठाणे पोलीस आयुक्तालय, ठाणे यांचेकडे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी तक्रार अर्ज करुन गुडांना शिक्षा करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महिलांना देहविक्रीकरीता जबरदस्ती करणे व जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या गुंडांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२२) :** (१), (२) व (३) सदर विषयाबाबत भिवंडी शहर पोलीस ठाणे, भिवंडी येथे दिनांक १२/०२/२०२२ रोजी व दिनांक ०४/०३/२०२२ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाले. सदर अर्जाची संबंधित तपासी अधिकाऱ्यांनी सविस्तर चौकशी केली असून त्यामध्ये काहीही निष्पन्न न झाल्याने सदर अर्ज दप्तरी दाखल करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.